# मानपत्र

## महनीय अल्लादिया खांसाहेब,

आपल्या पराक्रमाने भारतवर्षाची कीर्ति वाढविणाऱ्या व अभिमानपूर्वक निर्देश करण्यायोग्य अशा ज्या व्यक्ति प्रभूकृपेने आम्हाला लाभल्या त्यापैकी आपण एक आहात. साहित्यात रविंद्रनाथ टागोर, राजकारणात लोकमान्य टिळक व महात्मा गांधी, विद्यासंवर्धनात पं. मालवियजी इत्यादी श्रेष्ठ विभूती प्रमाणे संगीत क्षेत्रातील आपले स्थान एकमेव आहे. कै. राजर्षि श्री छत्रपती शाहू महाराज यांच्या कृपेमुळे करवीर हे आपल्या ऐन उमेदीतील कार्यक्षेत्र झाले व येथील आपल्या दिर्घकाळ वास्तव्यामुळे करवीरस्थांनी आपल्याविषयी पराकाष्टेचा अभिमानच वाटत आला आहे. श्रीमंत संपन्न होण्याचे परप्रांती आलेले अनेक योग मोहवश न होता ते आपण दूर सारले, ही आपली करवीरावरील एकनिष्ठा व प्रेमभावना आपल्या चारित्र्याला विशेष उज्वलता आणित आहे.

**तपस्वी खांसाहेब !** आपण गायन कलेत सम्राट व संगीत शास्त्रात महर्षि आहात , त्याचप्रमाणे लौकीक जीवनांत स्थितप्रज्ञ आहात. कीर्तिसंपन्न कर्त्या पुत्राच्या निधनाचे दारुण दुःख व आयुष्यातील कित्येक अनिष्ट योग उतार वयात सहन करुन आपण संगीताचे ज्ञानसत्र वयाच्या पंचाऐशींतही चालू ठेविले याहून अधिक उदात्त असे स्थित रुपतेचे उदाहरण क्वचितच सापडेल. सतत साठ वर्षे आपल्या अभिजात अतुलनीय गायकीचे स्वरुप कोणत्याही लौकीक मोहाला वश न होता आपण निर्मळ सोज्वळ ठेविले आणि अनेक प्रकारच्या मत्सरग्रस्त विरोधी वातावरणाला न जुमानता आपण आपल्या परंपरेच्या कलोपासनेचा कर्मयोग अखंड चालू ठेविला. आपला हा आदर्श रसिकांना स्फूर्तिदायक व कलाकारांना मार्गदर्शक झालेला आहे.

**कलासम्राट खांसाहेब !** आपल्या विशिष्ट गायनकलेचे वर्णन करणे शब्दांच्या सामर्थ्याबाहेर आहे. आपल्या कलेचे स्वरुप तसेच हिमनग भव्य आहे. आपल्या गायन प्रकारात नृत्याचे लालित्य, समशेरीची फेक, मल्लांचे डावपेच, नदीप्रवाहाचे गांभिर्य आणि सागराची संपन्नता आढळून येते. शिवाय आपली अगाध बुध्दिमत्ता व योजनाचातुर्य इत्यादि असामान्य गुणविशेषामुळे सम्राटपदावरुन द्रष्टा या दिव्य व ध्रुवपदाला आज आपण पोहोचला आहात.

महाराष्ट्रातील व विशेषत: करवीरातील आपल्या सुदीर्घ वास्तव्यामुळे संगीत कलामंदिराची अनेक नवीनवी दालने जिज्ञासू कलाभ्यासंगी लोकांना ज्ञात होऊ लागली व त्यामुळे तरुण पिढीच्या गायन-वेलीवर वसंत पालवीची नवीनता व विविधता येऊ लागली आहे. संगीत क्षेत्रातील ही आपली प्रभावी सत्ता संस्मरणीय होणारी व चिरकाल टिकणारी आहे.

**परमपुज्य खांसाहेब !** गायनकलेच्या सम्राटपदावर आपण दिर्घकाल अधिष्ठित झाला असूनही आपल्या ठिकाणी अहंभाव अणुमात्रही नाही या आपल्या गुणाचा उल्लेख केल्यावाचून रहावत नाही. आपल्या राहणीतील प्रतिष्ठितपणा, भाषेतील मितस्तपणा, समतोल गुणग्राहकता, अल्पज्ञांविषयी वत्सलता इत्यादि गुण आदर्शवत आहेत.

**अमरकीर्ति अल्लादिया खांसाहेब !** आपणास परमेश्वराने उदंड आयुष्य द्यावे आणि भारतीय संगीत कलेचे एक असामान्य वैभवशाली प्रतीक या भावनेने नम्र होण्यायोग्य महान विभूति आपल्या रुपाने आम्हाला दिर्घकाल लाभावी अशी जगन्नियत्यांस आम्ही अंत:करण पूर्वक प्रार्थना करतो.

आपली विनम्र

**गुणलुब्ध करवीर जनता २७/४ /१९४२**

शब्दरचना : गोविंदराव टेंबे,

लेखन व सजावट : शंकरराव घोरपडे (आर्टीस्ट)